**प्रेस नोट** **दिनांक २३/०३/२०१९**

# फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पाहिजे आरोपीस जेरबंद केले

फरासखाना पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना केंजळे चौक लक्ष्मी रोड पुणे येथे विरूध्द बाजुने एक इसम ॲक्टिवा गाडी वरुन भरधाव वेगाने येताना दिसला. त्यास पकडुन त्यास त्याचे नावपत्ता विचारता त्याने आपले नाव किशोर आनंद फाटक वय ३५ रा. मेहंदळे गॅरेज चौक कर्वेनगर पुणे मुळ रा.मु.पो.शिरवली ता.मुळशी जि.पुणे असे सांगितले. त्यावेळी त्यास पाहिल्यावर स्टाफमधील पो.हवा. २८४४ आढाव यांनी तो फरासखाना पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे सांगितले. त्यावेळी त्याची अंगझडती घेता त्याचे पँटचे खिशात पेटल पेंन्टस कार्पोरेशन ३५६ रविवार पेठ पुणे या दुकानातुन पेंन्ट खरेदी केल्याच्या बिल नंबर ९४४५ व ९४४६ अशा दोन पावत्या व रोख रक्कम ४५००/-रु.असे मिळुन आले. त्याबाबत त्याचेकडे चौकशी करता त्याने सांगितले की, दि.१२/०३/२०१९ रोजी सकाळी १०.३० वा.चे दरम्यान मी नमुद दुकानात जावुन दुकान मालकाचा विश्वास संपादन करुन त्यांचेकडुन तीन पेंटचे ड्रम व रोख रक्कम ४५००/-अशी घेवुन निघुन गेलो होतो त्या मालाची ही बिले असुन त्यांचेकडुन घेतलेले रोख स्वरुपातील ४५००/-रुपये आहेत. त्याअनुषंगाने फरासखाना पोलीस स्टेशनकडील गुन्हे अभिलेख पडताळुन पाहता सदरचा माल हा फ.खाना पो.स्टे.गु.र.नं.११५/२०१९ भा.द.वी.कलम.४०६,४२० मधील निष्पन्न होवुन सदरचा ताबे इसम हा त्यामधील फसवणुक करणारा आरोपी निष्पन्न झाला आहे. त्यानंतर त्यास दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि सुर्यवंशी व त्यांचे पथकाने केली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे्